# जनसंपर्क अधिकारी

**मिरा-भाईंदर, वसई-विरार पोलीस आयुक्तालय**
**रामनगर सृष्टी, मिरारोड पुर्व ता.जि.ठाणे**
**फोन नं. ०२२-२९४५१००१**
Mail ID- pro.cp.mb-vv@mahapolice.gov.in


**प्रेसनाट क्रमांक ३११-२२** **दिनांक १०/१०/२०२२**

## महत्वाचे व्यक्तींच्या दौऱ्यादरम्यान वाहतूक कोंडी होऊ नये याकरिता पोलीस उप आयुक्तांची वाहतूक नियंत्रण अधिसूचना जारी.

दिनांक ११/१०/२०२२ रोजी दुपारी ११.०० वा. ते सायंकाळी १७.०० वा. चे दरम्यान मिरा-भाईंदर शहरामध्ये मा. अती महत्वाच्या व्यक्तींचा दौरा असल्याने त्यांचा कॅनव्हॉय सुरळीत मार्गस्थ व्हावा, पार्किंगच्या व वाहतूक कोंडीच्या समस्या निर्माण होवू नये याकरिता महाराष्ट्र पोलीस अधिनियम १९५१ चे कलम ३३ (१)(ब) व मोटार वाहन कायदा कलम ११६ (१) (अ)(ब) अन्वये श्री विजयकांत सागर, पोलीस उप आयुक्त, मुख्यालय, मिरा-भाईंदर,वसई-विरार यांनी पर्यायी मार्गाने वाहतूक वळविणेबाबत वाहतूक नियंत्रण अधिसूचना खालीलप्रमाणे जारी केलेली आहे.

दिनांक ११/१०/२०२२ रोजी सकाळी ११.०० वा. ते सायंकाळी १७.०० वाजल्याचे दरम्यान स्थानिक रहिवासी व अत्यावश्यक सेवेतील वाहने (पोलीस प्रशासनाची वाहने, फायरब्रिगेडची वाहने, ॲम्बुलन्स, कार्यक्रमासाठी येणारी मा. व्हि.आय.पी. यांची वाहने इ.) वगळता इतर सर्व वाहनांना खालील नमुद ठिकाणी प्रवेश बंद करण्यात येत असून सदरची वाहने खालील नमुद पर्यायी मार्गाचा वापर करु शकतील.

१. **ठिकाण** - आरक्षण क्र. ३०२, हॉस्पिटल इमारत, मिरारोड पूर्व

**प्रतिबंधीत कालावधी** - दि. ११/१०/२०२२ रोजी ११.०० वा. ते १४.०० वा. पर्यंत

**प्रवेश बंद** - मिरारोड पूर्व, बेवर्ली पार्क येथील स्टार मार्केट जवळील टी जंक्शन ते बेवर्लीपार्क चौकापर्यंत (टीजेएसबी बँक कार्नर) सर्व वाहनांना जाण्यास व येण्यास प्रवेश बंद.

**पर्यायी मार्ग**- सदरची वाहने स्टारमार्केट टी जंक्शन – व्हि पॉवर जीम जवळील चौक ऊजवे बाजूस वळून - राजपूत सर्व्हिस सेंटर (बाकेराम तिवारी मार्ग) - बेवर्लीपार्क (टीजेएसबी बँक कार्नर) चौक अशा पर्यायी मार्गाचा दोन्ही बाजूने येण्यास व जाण्यास वापर करतील.

२. **ठिकाण** - मा. आमदार श्री. प्रताप सरनाईक यांचे कार्यालय

**प्रतिबंधीत कालावधी** - दि. ११/१०/२०२२ रोजी ११.०० वा. ते १५.०० वा. पर्यंत

**प्रवेश बंद** - मिरारोड पूर्व, हाटकेश येथील मिरा-भाईंदर रोडवरील विठ्ठल चौक (अस्मिता मेडीकल कॉर्नर) ते आईमाता स्वीट्स ॲण्ड नमकीन शार्प येथील चौकापर्यंत सर्व वाहनांना जाण्यास व येण्यास प्रवेश बंद.

**पर्यायी मार्ग**- सदरची वाहने विठ्ठल चौक (अस्तिता मेडीकल कॉर्नर) – एव्हरग्रीन वक्रतुंड सोसायटी-

शांतीवन सोसायटी जवळील चौक - आईमाता स्वीट्स ॲण्ड नमकीन शापॅ येथील चौक अशा पर्यायी मार्गाचा दोन्ही बाजूने येण्यास व जाण्यास वापर करतील.

३. **ठिकाण** - गान सम्राज्ञी लता मंगेशकर नाट्यगृह

**प्रतिबंधीत कालावधी** - दि. ११/१०/२०२२ रोजी १२.०० वा. ते १७.०० वा. पर्यंत

**प्रवेश बंद** - महामार्गाचे सर्व्हिस रोडने काशिमीरा पोलीस ठाणे बाजूकडून येणाऱ्या व दहिसर चेकनाक्याच्या दिशेने जाणाऱ्या सर्व वाहनांना स्टे-ईन लॉज कॉर्नर पासून सरळ पुढे सर्व्हिस रोडने हॅप्पी फॅमीली सुपरमार्केट जवळील टी जंक्शन पर्यंत जाण्यास व येण्यास प्रवेश बंद

**पर्यायी मार्ग** – काशिमीरा पोलीस ठाणे बाजूकडून येणारी वाहने ही स्टे ईन लॉज समोरील कट मधून सुरक्षीत ऊजवे बाजूस वळण घेऊन महामार्गाला मिळतील व इच्छित स्थळी जातील.

मा. अती महत्वाचे व्यक्ती सदर मार्गाने मार्गस्थ झाल्यानंतर ३० मिनीटांनी सर्व वाहनांना नमुद रस्त्यावरुन मार्गस्थ होण्यास मुभा असणार आहे.

----ooo----